(५०)

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.), मुंबई यास सन २०११-१२ या आर्थिक वर्षाकरिता भागभांडवली अंशदान मंजूर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय,क्रमांक:-माकमा-२०११/प्र.क्र.५/महामं
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :१७मार्च, २०१२.

वाचा :- १)शासन परिपत्रक,वित्त विभाग क्रमांक: अंदाज-२०.११/प्र.क्र.९३/२०११/अर्थसंकल्प-३, दिनांक ६/५/२०११.
२)शासन निर्णय,क्रमांक:-एलएएस-२०११/प्र.क्र.२६०/विघयो-२ दि.२०/९/२०११
३)सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, पत्र क्र. .बीजीटी-२०११/प्र.क्र.३११ अर्थसंकल्प,द.१३/१/२०१२.
४)शासन निर्णय,क्रमांक:-माकमा-२०११/प्र.क्र.५/महामं, दिनांक ५ मार्च,२०१२

शासन निर्णय :- उपरोक्त वाचा येथील अनुक्रमांक-४ वरील शासन निर्णय रद्द करण्यात येत असुन खालीलप्रमाणे सुधारीत आदेश शासन देत आहेत :-

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्या.मुंबई या शासन अंगीकृत उपक्रमाची स्थापना दिनांक ११ जुलै, १९८५ रोजी कंपनी अधिनियम, १९५६ अनुसार करण्यात आली आहे. या महामंडळामार्फत अनुसूचित जातीतील मातंग समाजातील व्यक्तींची आर्थिक उन्नती करण्यासाठी विविध योजना राबविण्यात येतात. या महामंडळाला भागभांडवलासाठी सन २०११-१२ या आर्थिक वर्षाकरीता रु.१५००.०० लाख (रुपये पंधरा कोटी फक्त ) एवढी मंजूर करण्यात आली आहे. सदर तरतूदीपैकी ७५ % म्हणजेच रु. ११२५.०० लाख (रु. अकरा कोटी पंचवीस लाख फक्त) एवढी तरतूद संदर्भाधिन वरील वाचा येथील अ.क्र.२ वरील शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आली आली आहे. आता एकूण अर्थसंकल्पीय तरतुदीपैकी ८५% एवढी रक्कम वितरीत करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. त्यानुसार सदरहू महामंडळाच्या भागभांडवलापोटी सन २०११-१२ मधील मूळ तरतूद रु.१५.०० कोटी व पूरक मागणीद्वारे अतिरिक्त भागभांडवलापोटी उपलब्ध झालेली तरतुद रु.६५.०० कोटी असे मिळून एकूण रु.८०.०० कोटी पैकी ८५% म्हणजेच रु.६८.०० कोटी पैकी पूर्वी वितरीत केलेली रक्कम वजा जाता रु.५६.७५ कोटी (रु. छप्पन कोटी पंच्याहत्तर लाख फक्त) वितरीत करण्यास शासन खालील अटी व शर्तीवर मान्यता देत आहे :-

i) महामंडळाने लाभार्थ्यांना अर्थसहाय्य मंजूर करण्याचे धोरण अशा प्रकारे निश्चित करावे जेणेकरुन भविष्यात लाभार्थ्यांकडून वसुलीच्या थकबाकीत वाढ होणार नाही.

ii) महामंडळाचे वार्षिक लेखे विधीमंडळास सादर करणे ही संविधानिक जबाबदारी आहे. त्यासाठी अपूरा कर्मचारी वर्ग हे कारण न देता महामंडळाचे वार्षिक लेखे विधीमंडळास ६ महिन्याच्या आंत सादर करण्याची कार्यवाही करावी.



Scanned by CamScanner

iii) महामंडळाने वसूलीबाबत विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. कारण या वसूलीमधूनच नवीन लाभार्थ्यांना निधी उपलब्ध करुन देता येईल. तसेच राष्ट्रीय उपक्रमांचे कर्ज देखील फेडता येईल. तरी महामंडळाच्या वसूलीचे अत्यल्प असलेले प्रमाण वाढविण्यासाठी ठोस उपाययोजना करुन त्याप्रमाणे प्रयत्न करावेत.

iv) थकबाकीच्या रकमा कालबध्द पध्दतीने वसुल करण्याबाबतची उपाययोजना/धोरण सुचविण्यात यावे.

v) महामंडळ राबवित असलेल्या योजनांची माहिती ( यावर्षी निश्चित केलेली उद्दीष्टे व साध्य झालेले लक्ष्य ) शासनाकडे सादर करावी.

vi) योजनेतर निधीतील खर्चासाठी शासनाने ठरविलेले निर्बंध काटेकोरपणे अंमलात आणावेत.

vii) कर्ज वसुलीमध्ये समाधानकारक प्रगती नसल्यास पुढील वर्षी भागभांडवल अशंदान वितरीत करण्यात येणार नाही याची महामंडळाने नोंद घ्यावी.

viii) सदर भागभांडवल हे अधिकृत भागभांडवलाचा भाग राहील.

२. प्रस्तुत शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेली रक्कम अदा करण्यासाठी विभागीय समाजकल्याण अधिकारी, कोकण विभाग, नवी मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. विभागीय समाजकल्याण अधिकारी, नवी मुंबई यांनी सदरहू रक्कम म.को.नि.४४ मधील नमुन्यातील देयकान्वये लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्यादित), मुंबई यांना अदा करावी. तसेच सदर देयकावर प्रतिस्वाक्षरी करण्याचे अधिकारही त्यांना किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिका-यांस देण्यात येत आहेत.

३. या कार्यावर होणारा खर्च पुढीलप्रमाणे नमूद केलेल्या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकावा व तो चालू आर्थिक वर्षाच्या मंजूर तरतुदीतून तसेच पुरक मागणीव्दारे उपलब्ध झालेल्या तरतुदीतून भागविण्यात यावा:-

४२२५ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग यांच्या कल्याणावरील भांडवली खर्च,
०१ अनुसूचित जातीचे कल्याण
१९० सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणूका,
पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, राज्य योजनांतर्गत योजना
(०१)(०१) लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळास भागभांडवली अंशदान ( मातंग उन्नती महामंडळ) (४२२५ ००२ २) (वि.घ.यो.)
५४ गुंतवणूका
मागणी क्रमांक एन-४



Scanned by CamScanner

४. हा शासन निर्णय नियोजन व वित्त विभागाच्या सहमतीने व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ५४/व्यय- १४,दि.०२/०३/२०१२ अन्वये दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(कि.पां.वडते)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

आयुक्त , समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
विभागीय समाजकल्याण अधिकारी, कोकण विभाग, नवी मुंबई (दोन प्रती)
व्यवस्थापकीय संचालक, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ(मर्या.) मुंबई
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा) महाराष्ट्र १ .
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
जिल्हा कोषागार अधिकारी, मुंबई, ठाणे.
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
अप्पर कोषागार अधिकारी, कोकणभवन, नवी मुंबई.
नियोजन विभाग (का.१४३१) मंत्रालय,मुंबई
वित्त विभाग, (का साउ /अर्थोपाय), मंत्रालय, मुंबई.
कक्ष अधिकारी, (अर्थसंकल्प/नियोजन), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
निवड नस्ती का-महामंडळे

21/3/12





Scanned by CamScanner